# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/१८६८/२०१९ दिनांक ०४/०२/२०१९

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :— इतिहास परिषदेच्या ५१ व्या अधिवेशनाबाबत...**

**संदर्भ** :— शरदराव पवार कला आणि वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर ता. कोरपना जि. चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक SPM/671/2019 दिनांक ३०.०१.२०१९

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **शरदराव पवार कला आणि वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर ता. कोरपना जि. चंद्रपूर** येथे **रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे** इतिहास परिषदेचे ५१ वे अधिवेशन **दिनांक १५ व १६ फ्रेबुवारी, २०१९** रोजी आयोजीत करण्यात आलेले आहे.

करीता आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या विभाग प्रमुख, प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करून देण्यात यावे, ही विनंती.

**(डॉ. ईश्वर मोहुर्ले)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**संलग्न** :— परिषदेची कार्यक्रमपत्रिका.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# इतिहास परिषद
# ५१ वे अधिवेशन

आयोजक

सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, गडचांदूर द्वारा संचालित
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारा संलग्नित

## शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय,
## गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर

(NAAC द्वारा 'ब' श्रेणी प्राप्त CGPA 2.48)

## इतिहास विभाग

# सस्नेह निमंत्रण

**दिनांक १५ व १६ फेब्रुवारी २०१९**



आयोजक

मा.डॉ. संजयकुमार सिंह
प्राचार्य
शरदराव पवार महा. गडचांदूर

प्रा.डॉ. शरद बेलोरकर
संयोजक तथा सचिव इतिहास परिषद
शरदराव पवार महा. गडचांदूर

प्रा.डॉ. संजय गोरे
समन्वयक IQAC
शरदराव पवार महा. गडचांदूर

महोदय,

स.न.वि.वि.

आपणांस कळविण्यात आनंद होतो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली च्या इतिहास परिषदेचे ५१ वे अधिवेशन औद्योगिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या समुद्ध असणा-या गडचांदूर नगरीतील शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर येथे १५ फेब्रुवारी व १६ फेब्रुवारी २०१९ रोजी संपन्न होत आहे. या दोन दिवसीय अधिवेशनाला उपस्थित राहून आम्हांस उपकृत करावे, हि नम्र विनंती.

**गडचांदूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील महाराष्ट्र-आंध्रप्रदेश सीमेवर वसलेल्या गडचांदूर नगरीचा स्वातंत्र्योत्तर इतिहास आहे. पुर्वी निजामाच्या अधिपत्याखाली असलेला हा भाग आदिवासी बहुल व ग्रामीण भाग म्हणून ओळखला जातो. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले असले, तरी हा भूभाग निजामाच्या अधिपत्याखाली होता. मात्र नंतर झालेल्या पोलीस कार्यवाहीमुळे राजुरा, गडचांदूर, कोरपना, जिवती हा भाग १७ सप्टेंबर १९४८ रोजी ख-या अर्थाने स्वतंत्र झाला. म्हणून १७ सप्टेंबर हा दिवस या परिसरात मुक्तीदिन म्हणून साजरा केल्या जातो. या दिवशी महाराष्ट्र शासनाने शासकीय सुट्टी जाहीर केली आहे. आज स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर गडचांदूर व परिसर औद्योगिक व ऐतिहासिक-दृष्ट्या प्रगतीपथावर असून गडचांदूर नगरीच्या ८ कि.मी. च्या परिसरामध्ये अल्ट्राटेक सिमेंट लि.मि., माणिकगड सिमेंट लि.मि. व अंबुजा सिमेंट उद्योग असे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ३ सिमेंट कारखाने आहेत. येथे ऐतिहासिक माणिकगड किल्ला, पुरातन विष्णु मंदीर, सोमेश्वर मंदीर असे ऐतिहासिक वारसा लाभलेली स्थळे आहेत. गडचांदूरचा गतकालीन वारसा हा आजही इतिहासाची साक्ष देत आहे.

**संस्थेविषयी :** गडचांदूर सारख्या ग्रामीण भागात सन १९८२ मध्ये शिक्षणमहर्षी स्व. हरिभाऊ डोहे गुरुजींनी सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. आज स्व. हरिभाऊ डोहे गुरुजींनी निर्माण केलेल्या विद्या अंकुराचा विस्तार झाला असून या भागातील गोरगरीब, आदिवासी हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आजमितीला संस्थेचे एक वरिष्ठ महाविद्यालय असून २ (कला, विज्ञान व व्यवसाय) कनिष्ठ महाविद्यालये, ३ विद्यालये व १ इंग्रजी माध्यम शाळा असा संस्थेचा विस्तार झाला आहे. वंचितांना शिक्षण प्राप्त व्हावे व विद्यार्थी आत्मनिर्भर झाला पाहिजे. ही मुल्याधिष्ठित भावना स्व. हरिभाऊ डोहे गुरुजींची होती. त्यांचे हे ध्येय उराशी बाळगून विद्यमान संस्था पदाधिकारी परिश्रमाने संस्थेला प्रगतीपथावर नेत आहेत.





**महाविद्यालयाविषयी :** सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, गडचांदूर द्वारा संचालित शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना सन १९९३ रोजी झाली. कोरपना, जिवती तालुक्याच्या दुर्गम व आदिवासी बहुल परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी. या उदात्त हेतूने या महाविद्यालयाची स्थापना झाली. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व समाजाच्या जडणघडणीत त्याचे बहुमुल्य योगदान लाभावे. हा सामाजिक अभिसरणाचा विचार घेऊन महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे. महाविद्यालयात येणा-या विद्यार्थांच्या भविष्याचा विचार करणारे या भागातील ज्ञान संस्कार केंद्र म्हणून आमच्या महाविद्यालयाचा लौकिक असून स्मार्ट क्लास रुम, आधुनिक इंटरनेट लॅब, स्वतंत्र डिपार्टमेंट IQAC विभाग, सेमिनार हॉल, कॉन्फरन्स हॉल, महिला स्वतंत्र कक्ष, विद्यार्थी स्वतंत्र कक्ष, माजी विद्यार्थी विभाग, रासेयो विभाग, सांस्कृतिक विभाग, अद्यावत प्रशासकीय विभाग, अद्यावत मध्यवर्ती ग्रंथालय, सुसज्ज जिमखाना तसेच सुंदर पर्यावरणासाठी 'टेरेस गार्डन' अशा आधुनिक पायाभूत सुविधा महाविद्यालयात आहेत. महाविद्यालयात उच्चविद्याविभूषीत प्राध्यापक असून सर्वच अध्यापकांनी पीएच.डी. ही संशोधन पद्वी प्राप्त केली आहे. महाविद्यालयास सन २०१२-१३ मध्ये रासेयोचा उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून विद्यापीठाचा पुरस्कार प्राप्त झाला असून रासेयो, सांस्कृतिक, क्रीडा तथा विविध सामाजिक उपक्रमात महाविद्यालय अग्रेसर आहे. महाविद्यालय गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नीत असून सप्टेंबर २०१७ मध्ये नॅक बंगलोर द्वारा केलेल्या मुल्यांकनामध्ये प्राप्त झालेली 'B' (CGPA 2:48) श्रेणी ही महाविद्यालयाच्या निरंतर प्रगतीचे द्योतक आहे.

**इतिहास परिषदेविषयी :** इतिहास परिषदेची मुळ स्थापना १९६७ रोजी झाली असून हे या इतिहास परिषदेचे ५१ वे अधिवेशन आहे. गडचांदूर येथील शरदराव पवार महाविद्यालय हे या परिषदेचे मुख्य यजमान आणि आयोजक आहे. स्वातंत्र्यानंतर विदर्भाच्या वाटचालीचा लेखाजोखा तथा विदर्भाच्या इतिहासात आदिवासी समाजाचे व संस्कृतीचे योगदान या मुख्य विषयांवर प्रामुख्याने सदर अधिवेशनात चर्चा होणार आहे. गडचांदूर हा परिसर आदिवासी बहुल असून या परिसरात (गोंड, कोलाम) आदिवासी बांधवांचे वास्तव्य आहे. या इतिहास परिषदेच्या माध्यमातून आदिवासींचे भारतातील सामाजिक आणि ऐतिहासिक संस्कृतीच्या विकासात असलेले बहुमुल्य योगदान समाजासमोर यावे, तसेच विद्यमान पिढीला विदर्भाच्या गतकालीन ऐतिहासिक वैभवांची व वारशांची ओळख पटावी तद्वत विदर्भाच्या विकासात सर्वार्थाने समाजाला योगदान देता यावे या उदात्त हेतूने सदर दोन दिवसीय इतिहास परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे.





## अधिवेशन रुपरेषा

**ंदणी व अल्पोहार : दि. १५ फेब्रुवारी २०१९ शुक्रवार सकाळी ११.३० ते १.३० वाजता**

**उद्घाटन : दि. १५ फेब्रुवारी २०१९ शुक्रवार दुपारी २.०० वाजता**

उद्घाटक : मा.डॉ. नामदेवराव कल्याणकर,
कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

अध्यक्ष : मा.डॉ. आनंदराव अडबाले,
अध्यक्ष, सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, गडचांदूर

विशेष अतिथी : मा.डॉ. वेदप्रकाश मिश्रा,
चान्सलर, क्रिष्णा इन्स्टीट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस, कराड
: मा.डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत, माजी कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
तथा व्यवस्थापन परिषद सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

बिजभाषक : मा.डॉ.बी.आर. वाघमारे,
सदस्य, अधिसभा तथा माजी परिक्षा नियंत्रक स.गा.वि. अमरावती

परिषदेचे अध्यक्ष : मा.डॉ.व्हि.जी. बैस,
इतिहास विभाग प्रमुख, यशवंत महाविद्यालय, वर्धा

प्रमुख अतिथी : मा.डॉ. श्रीराम कावळे, अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
: मा.डॉ. भुपेश चिकटे, प्राचार्य शिवाजी महाविद्यापलय, गडचिरोली तथा माजी अधिष्ठाता, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
: मा.डॉ. संजयकुमार सिंह,
प्राचार्य, शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर तथा अधिसभा सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

परिषदेचे सचिव : मा.प्रा.डॉ. शरद बेलोरकर,
सदस्य, इतिहास अभ्यास मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

---

परिसंवाद : दि. १५ फेब्रुवारी २०१९ सायं. ४ ते ६ वाजता
विषय : **स्वातंत्र्योत्तर विदर्भ**
अध्यक्ष : मा.प्रा.डॉ. नितीन चांगोले,
इतिहास विभागप्रमुख शिवाजी महाविद्यालय, अमरावती
वक्ते :
: मा.प्रा.डॉ. किशोर नागपूरे
: मा.प्रा.डॉ. लाखे
: मा.प्रा.डॉ. नरेश कवाडे
: मा.प्रा.डॉ. संजय ठवळे
: मा.प्रा.डॉ. रविंद्र मुन्द्रे
: मा.प्रा.डॉ. निलिमा कोहळे
: मा.प्रा.डॉ. नाना वानखेडे
: मा.प्रा.डॉ. स्मिता जाधव
: मा.प्रा.डॉ. दिपक लोणकर
: मा.प्रा.डॉ. रुपेश मेश्राम
: मा.प्रा.डॉ. नत्थु गिरडे

भोजन : सायं. ६.०० वाजता

**अल्पोहार : दि. १६ फेब्रुवारी २०१९ शनिवार सकाळी ८ ते ९ वाजता**

चर्चासत्र : सकाळी ९ ते ११.०० वाजता
विषय : **विदर्भाच्या इतिहासात आदिवासी समाजाचे योगदान**
अध्यक्ष : मा.प्रा.डॉ.एस.वाय. कोरेटी,
अध्यक्ष, इतिहास अभ्यास मंडळ, रा.तु.म. विद्यापीठ, नागपूर
वक्ते :
: मा.प्रा.डॉ. नामदेव हटवार
: मा.प्रा.डॉ. दिगंबर कापसे
: मा.प्रा.डॉ. गोविंद तिरमनवार
: मा.प्रा.डॉ. कविता तातेड
: मा.प्रा.डॉ. माया वानखेडे
: मा.प्रा.डॉ. रफिक शेख
: मा.प्रा.डॉ. आनंद भोयर
: मा.प्रा.डॉ. मनोज सोनटक्के
: मा.प्रा.डॉ. प्रमोद बोधाने
: मा.प्रा.डॉ. नरेश मडावी
: मा.प्रा.डॉ. सुरेश काळे

**शोधनिबंध वाचन :** सकाळी ११ ते दुपारी १२ वाजता

**प्राचीन कालखंड**

अध्यक्ष प्रा.डॉ. शरद डवरे

**मध्ययुगीन कालखंड**

अध्यक्ष प्रा.डॉ. नामदेव ढाले

**आधुनिक कालखंड**

अध्यक्ष प्रा.डॉ. संगीता मेश्राम

विभागप्रमुख पी.जी.टी.डी. रा.तु.म. विद्यापीठ, नागपूर

**इतिहास परिषद आमसभा**

दुपारी १२ वाजता

## आचार्य पदवीप्राप्त प्राध्यापकांचा सत्कार व समारोपीय कार्यक्रम

दुपारी १२.३० वाजता

**अध्यक्ष** : मा.डॉ. विजय हंबर्डे,
सेवानिवृत्त इतिहास विभागप्रमुख, ज्ञानेश महाविद्यालय, नवरगांव

**प्रमुख अतिथी** : मा.डॉ. चंद्रशेखर भुसारी,
प्र. कुलगुरु गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

: मा.डॉ. अनिल चिताडे, संचालक, परिक्षा व मुल्यमापन विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

: मा.डॉ. रमेश बोभाटे,
प्राचार्य विद्याविकास महाविद्यालय, समुद्रपूर

: मा.प्रा.डॉ. प्रकाश शेंडे,
अधिसभा सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**भोजन** : दुपारी १.३० वाजता

**शोध निबंध :**

१) शोध निबंध यापुर्वी प्रसिद्ध केलेला नसावा.
२) शोध निबंध नियमानुसार ५-६ पृष्ठांचा व संदर्भग्रंथ सुची क्रमानुसार लावलेला असावा.
३) शोध निबंधावर संशोधकाचे पुर्ण नांव, मोबाईल क्रमांक लिहिलेला असावा
४) परिषदेला येतांना शोध निबंध व शोध निबंधाची सि.डी. सोबत आणावी.
५) शोध निबंधाचे प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक या सत्रात वाचन करण्यात येतील.

**परिषद प्रतिनिधी शुल्क :** प्रतिनिधी रु. १०००/-
विद्यार्थी रु. ३००/-



उपक्रम : प्रसिद्ध छायाचित्रकार श्री. देवानंद साखरकर यांचे ऐतिहासिक वास्तुंचे फोटो प्रदर्श

मुद्रक : स्वरांजली ग्राफिक्स्, राजुरा - 9623494995

## इतिहास परिषदेची कार्यकारणी

### अध्यक्ष

प्रा.डॉ. विरेंद्र गोपालसिंह बैस

### उपाध्यक्ष

प्रा.डॉ. मनिष चव्हाण (नागपूर)

प्रा.डॉ. रविंद्र मुन्द्रे (अमरावती)

प्रा. राजेंद्र देवाळकर (चंद्रपूर-गडचिरोली)

### सचिव

प्रा.डॉ. शरद बेलोरकर

### सहसचिव

प्रा.डॉ. संजय ठवळे (नागपूर)

प्रा.डॉ. प्रविण सदार (अमरावती)

प्रा.डॉ. मिलिंद भगत (चंद्रपूर-गडचिरोली)

### विभागीय प्रमुख

प्रा.डॉ. महेंद्र गायकवाड (नागपूर)

प्रा.डॉ. वैशाली भाकरे (अमरावती)

प्रा. जयंत काकडे (चंद्रपूर-गडचिरोली)

### सदस्य

प्रा.डॉ. ओमप्रकाश बोबडे (अमरावती शहर)

प्रा.डॉ. संदीप राऊत (अमरावती ग्रामीण)

प्रा.डॉ. रवि लोणारे (नागपूर शहर)

प्रा.डॉ. हितेंद्र तागडे (नागपूर ग्रामीण)

प्रा. संतोष गोहोकार (चंद्रपूर-गडचिरोली शहर)

प्रा. संजय उगेमुगे (चंद्रपूर-गडचिरोली ग्रामीण)

### आयोजक

प्रा.डॉ. हेमचंद दुधगवळी, प्रा.डॉ. सुनिल बिडवाईक, प्रा.डॉ. राजेश गायधनी, प्रा.डॉ. माया मसराम, प्रा.डॉ. सतेंद्रसिंह, प्रा. मंगेश करंबे, प्रा.डॉ. प्रमोद घ्यार, प्रा.डॉ. पुरुषोत्तम माहुरे, प्रा.डॉ. कुंदन सहारे, प्रा.डॉ. मोहन कापगाते, प्रा.डॉ. गौतम शंभरकर, प्रा.डॉ. दिवाकर कामडी, प्रा. श्रीकांत पानघाटे, प्रा. जयंत विरुळकर, प्रा. चावरे, प्रा. अरविंद ढोके, प्रा. राजुरवाडे, प्रा. वाकोडे, प्रा. मस्की, प्रा. झाडे, प्रा. गजानन घुमडे, प्रा. गुरुदास बल्की, प्रा. दिवाकर चौधरी, प्रा. सुजित पोलेवार, श्री. शशांक नामेवार, श्री. आनंद नळे, श्री. विनोद उरकुडे, श्री. रमेश भोयर, श्री. तानाजी बु-हाण, श्री. धर्मराज पोहाणे, श्री. सुभाष टेकाम, श्री. सुरेश चांदेकर.

टिप :

१) गडचांदूर हे गांव चंद्रपूर पासून बल्लारशहा - राजुरा - आदिलाबाद मार्गावर ५० कि.मी. अंतरावर आहे.

२) गडचांदूर हे गांव बल्लारशहा रेल्वे स्थानकावरुन राजुरा - आदिलाबाद मार्गावर २७ कि.मी. अंतरावर आहे.

३) गडचांदूर हे गांव वणी - कोरपना - राजुरा मार्गावार ६० कि.मी. अंतरावर आहे.

### संपर्क

कार्यालय - फोन नं. ०७१७३-२४६२६९, मो.क्र. ९८९०८३१८९०

Website : www.spmgadchandur.ac.in

Email Id : Sharad_pmv@yahoo.in / sharadbelorkar@gmail.com